# विष्णुशास्त्री

प्रा. श. श्री. पुराणिक



# विष्णुशास्त्री

प्रा. श. श्री. पुराणिक

रविराज
प्रकाशन

मुद्रक
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

प्रथमावृत्ती
फेब्रुवारी १९९२

मुखपृष्ठ
ल. म. कडू

©
प्रा. श. श्री. पुराणिक
लक्ष्मी निवास-हनुमानवाडी
चाळीसगाव ४२४ १०१

प्रकाशक
रवि बेहेरे
रविराज प्रकाशन
४५८/२ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

मूल्य
एकशे पन्नास रुपये

# विष्णुशास्त्री

प्रा. श. श्री. पुराणिक ह्यांची ' विष्णुशास्त्री ' ही-लेखमाला ! सोबत 'मध्ये गेल्या वर्षी सुरू झाल्याबरोबर माझे लक्ष वेधले. बरेच वर्षात नाहीतरी शास्त्रीबोवांवर नवे पुस्तक नव्हतेच, म्हणून उत्कंठेने मी श्री. रवि बेहेरे ह्यांचेकडून हस्तलिखिते आणून वाचलीच.

ह्या व्यक्तिमत्त्वाच्या महावस्त्राचे उभे आडवे धागे आणि त्यावरील जरीकाम ज्या पद्धतीने लेखक उलगडून दाखवत होते ते निश्चितच वेगळ्या प्रकारचे होते. महाराष्ट्राच्या-खरं तर भारताच्या उर्जा उत्थानाच्या प्रथम चरणातला हा हुंकार-अनेक संस्था उभा करणारा-अनेक जीवनांना प्रेरणा देणारा ! शास्त्रीबोवांप्रमाणेच आंग्ल व संस्कृत भाषेतील अवतरणांनी हे पुस्तक लेखकाने सिद्ध केलेले ! त्यांचे समकालीन आणि त्यांच्या परंपरेतील दिग्गज ह्यांचे दर्शन घडवताना लेखकाने संदर्भासाठी केवढा खटाटोप चाळीसगावसारख्या तालुक्याच्या ठिकाणी राहून केलेला !

मला आकर्षण वाटले-मी विचारात आणि शैलीत गुंततच गेलो.

लेखकाच्या मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध व राजवाडे चरित्राप्रमाणेच ह्याचे स्वागत रसिक वाचक करतील.

**श्री. म. जोशी**
प्रभात रोड, पुणे ४.

प्रतिकूल
राजकीय व सामाजिक परिस्थितीत
मराठी माणसाची सदैव
' सोबत '
करणाऱ्या
सोबतकार
कै. ग. वा. बेहेरे
यांच्या
स्मृतीस

प्रस्तावना / ८

साभार ऋणनिर्देश / १४

प्रकरण पहिले / जन्म व बालपण (इ. स. १८५०) / १७

प्रकरण दुसरे / डेक्कन कॉलेजात / ३०

प्रकरण तिसरे / अध्यापन / ५५

प्रकरण चवथे / निबंधमाला (इ. स. १८७४–७६) / ७६

प्रकरण पाचवे / निबंधमाला (इ. स. १८७५–७६) / ९५

प्रकरण सहावे / निबंधमाला (इ. स. १८७५–७६) / ११५

प्रकरण सातवे / निबंधमाला (इ. स. १८७६–७७) / १५८

प्रकरण आठवे / रत्नागिरी (इ. स. १८७८–८०) / १८९

प्रकरण नववे / पुणे (इ. स. १८७९–८२) / २३४

प्रकरण दहावे / पुणे (इ. स. १८८२) / ३०१

प्रकरण अकरावे / आजच्या संदर्भात विष्णुशास्त्री (१८८१) / ३४५

## प्रस्तावना

### तीस वर्षांपूर्वीची गोष्ट

त्या गोष्टीला आज तीस वर्षे झाली. आमच्या घरात जुन्या पुस्तकांचा शोध घेत असताना, 'निबंधमाले'चे एक अगदी जीर्ण पुस्तक माझ्या हाती आले. या जगात प्रत्येक वस्तू अपूर्ण आहे. त्याप्रमाणे ते पुस्तकही अपूर्णच होते आणि ग्रंथालयातील जुन्या आणि आबाळ झालेल्या पुस्तकांप्रमाणे ते पुस्तकही परमेश्वरासारखेच 'अनादि' आणि 'अनंत' होते. पण एकदा ते पुस्तक हाती घेतले मात्र, वाचता वाचता मी त्यात अगदी रंगून गेलो. त्या ग्रंथात जॉनसनचे चरित्र मी प्रथम वाचले. आणि गिबन आणि मेकॉले यांची सुरेख आणि संक्षिप्त शब्दचित्रे तेथेच मला दिसली. त्यावर इतकी वर्षे झाली आणि विष्णुशास्त्र्यांना जाऊनही शंभर वर्षे होऊन गेली पण जॉन्सन, मेकॉले व गिबन ह्या थोर इंग्रज लेखकांची इतकी सुंदर चरित्रे अजूनही माझ्या वाचण्यात आली नाहीत. ह्या निबंधात जागोजाग दिलेल्या गडगंज ग्रंथातील अवतरणांच्या तळटीपा पाहून तर मी चकित होऊन गेलो. आणि 'प्रमदा लोचनन्यस्तं सलीमसमिवांवनम्। 'उदितवनि द्विजराजे कस्य न हृदयंमुदं परांधत्ते। संकुचसि कमल यदयं हरहर वामो विधिर्भवतः ॥' संस्कृत आणि 'बोलणे फोल झाले। डोलणे वाया गेले' अशी मराठी सुभाषिते पाहून हा माणूस मोठा रसिक आणि व्युत्पन्न असला पाहिजे असा माझा ग्रह झाला. पण या सर्वांपेक्षाही माझे लक्ष जर कशाने खेचून घेतले असेल तर त्या ग्रंथाच्या रसाळ आणि विदग्ध भाषाशैलीने होय. दयानंदांवरची टीका, ज्ञानोदय, सुबोध पत्रिका आणि एलिफास साहेबांना दिलेले उत्तर, लोकहितवादींवरील टीका, 'आमच्या देशाची स्थिती' मधील उपरोध, हे सर्व भाग वाचताना वेळ कसा गेला हे लक्षात आले नाही. आज इतकी वर्षे झाली तरी निबंधमालेतील या चटकदार शैलीची जी छाप मनावर पडली ती कायम आहे. आणि हातात पुस्तक घेतले की ते वाचायला लावण्याचा विलक्षण गुण या लेखकाच्या लेखणीत आहे याची खात्री पटली. आक्षेप कितीही असोत, सर्वांना एक उत्तर पुरेसे आहे– लेखकाचा उद्देश आपले पुस्तक लोकांना वाचायला लावणे हा आहे –

'To thousand Cavils, one answer is sufficient; the purpose of a writer is to be read.' असे जॉनसनने म्हटले आहे, ते खरे आहे. हा 'वाचनीयते'चा (Readability) चा गुण निबंधमालेमध्ये ओतप्रोत भरलेला आहे हे आजही नाकारता येण्यासारखे नाही.

## हा माणूस होता तरी कसा ?

विष्णुशास्त्र्यांची व माझी ओळख तीस वर्षांपूर्वी अशा प्रकारे झाली. तेव्हापासून त्यांच्याबद्दल एक प्रकारचे कुतूहल मनात होते. पुढे टिळक, काळकर्ते परांजपे, पांगारकर, हरिभाऊ आपटे यांचे वाङमय वाचनात आले आणि अशा माणसांचा सहकारी आणि स्फूर्तिदाता असलेला हा माध्यमिक शाळेतला 'मास्तर' होता तरी कसा याची उत्सुकता वाढू लागली. पण या दृष्टीने माडखोलकर, आगरकर, बनहट्टी, क्षीरसागर, माटे, टिकेकर; कुसुमावती देशपांडे यांचे साहित्य वाचू लागलो तर मनाचा जास्त गोंधळ मात्र होऊ लागला. कोणी त्यांना आधुनिक व पुरोगामी समजू लागले तर कोणी त्यांना प्रतिगामी आणि ब्राह्मणी धर्माचा पुरस्कार करणारे संकुचित देशाभिमानी समजू लागले, कोणी त्यांना 'महाराष्ट्रवाणीचा पति' म्हणू लागले तर कोणी 'मी मराठी भाषेचा शिवाजी आहे' ही त्यांची प्रसिद्ध दर्पोक्ती पोकळ प्रौढी समजू लागले, असे दिसून आले. एकच वस्तू अनेकांना अनेक प्रकारे दिसते, तेव्हा 'हत्ती आणि सहा आंधळे' या प्रसिद्ध गोष्टीप्रमाणे फरक वस्तूत नसून पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनात आहे हे उघड होते. या विद्वानांच्या 'मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।' अशा परिस्थितीत आमच्यासारख्या अनधिकारी माणसाला वाट सापडणे मुष्किल होते आणि विष्णुशास्त्री दस्तुरखुद्द कसे होते याचा पत्ता लागत नव्हता ते वेगळेच. म्हणून 'आत्मबुद्धि सुखायैव गुरुबुद्धि विशेषतः । परबुद्धि विनाशाय ।' या वचनावर भिस्त ठेवून मी स्वतःच विष्णुशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध सुरू केला. त्या शोधयात्रेची फलश्रुति म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय.

## मला काय 'सापडले ?'

माझ्या अभ्यासात मला असे दिसून आले की विष्णुशास्त्री हा माणूस समजला जातो तितका वर्णवर्चस्ववादी आणि प्रतिगामी आणि परंपरापूजक नाही. त्यांनी 'स्वजातीय विघाताय माहात्म्यं दृश्यते मृणाम् श्येनो विहंगमानेव हिनस्ति न भुजंगमान् ।।' (आपल्या जातीच्या घात करण्यातच माणसांचा पराक्रम दिसून येतो. ससाणा पक्षांनाच मारतो, सर्पांना नाही) या प्रसिद्ध सुभाषिताप्रमाणे, लोकहितवादीप्रमाणे ब्राह्मणांना शिव्या दिलेल्या नाहीत हे खरे पण ब्राह्मणांचे भलते समर्थनही कोठे केलेले नाही. त्यांना पेशवाईचा अभिमान असला तरी प्रजासत्ताक राज्याचे स्वप्न पाहताना पेशवाईची पुनरावृत्ती करण्याची कालहृत कल्पना न करण्याइतके लोकसत्तेचे ज्ञान त्यांना होते; स्त्री-मुक्तीच्या बाबतीत आजच्याइतकी मजल

त्यांनी मारलेली नसली तरी विधवांचे दुःख पाहून त्यांचे अंतःकरण तिळतिळ तुटत होते. रानडे, लोकहितवादी इ. मोठ्या व छोट्या सुधारकांवर त्यांनी टीका केली ती सुधारणांवर नसून परस्पर सुधारणा करू पाहणाऱ्या त्यांच्या वृत्तीवर होती. आणि व्यक्तिगत टीका न करण्याचे पथ्य तर त्यांनी कसोशीने पाळले होते. इंग्रजांचा द्वेष त्यांनी केला असला तरी इंग्रजीचा केला नाही, आणि मराठीचा पुरस्कार त्यांनी केला तितका आज शंभर वर्षांनंतर आपण करीत नाही. शकुनापशकुनाच्या बंडाबद्दल आणि भुतेखेते' ग्रहांचे परिणाम यांच्याबद्दल त्यांचे विचार तर आजच्या बुद्धिवाद्याला मागे सारतील इतके पुरोगामी आहेत. कारण अजूनही आपण मुहूर्त पाहिल्याशिवाय निवडणुकीच्या मोहिमेचे प्रस्थान ठेवीत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सामाजिक बांधिलकीच्या गोष्टी आपण आज बोलतो पण त्या काळात लोकांच्या भाषेत लोकांसाठी ' निबंधमाला ' लिहिणारे विष्णुशास्त्री आणि आपले इतिहास ग्रंथ लिहिणारे राजवाडे पाहिले म्हणजे सामाजिक बांधिलकीची परंपरा आजच सुरू झालेली नाही, ती ज्ञानेश्वर तुकारामाइतकी आणि ' संस्कृत भाषा देवे केली । प्राकृत काय चोरापासोनी जाली ।' असे विचारणाऱ्या एकनाथांइतकी जुनी आहे हे दिसून आल्याशिवाय रहात नाही. म्हणून विष्णुशास्त्र्यांवरची टीका ही बरीचशी विपर्यस्त, पूर्वग्रहदूषित, एकांगी आणि पक्षपाती आहे असे मला दिसून आले. अर्थात विष्णुशास्त्री हे सर्वगुणसंपन्न आणि परिपूर्ण होते असे नाही, पण दाखवले जातात तितके ते दोषांचा केवळ पुतळा होते आणि थिटे होते असेही नाही. माझे हे निष्कर्ष मी ह्या ग्रंथात मांडले आहेत.

## हा माणसाचा शोध आहे

ह्या ग्रंथाचे स्वरूप प्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे. मला विष्णुशास्त्री यांचे व्यक्तिदर्शन अभिप्रेत होते. हा माणसाचा शोध होता. त्यामुळे निबंधमालेतील प्रत्येक निबंधाचे सांगोपांग परीक्षण करण्याच्या उद्योगात मी पडलेलो नाही. कारण ते काम माझ्यापेक्षा अधिकारी लेखकांनी अधिक उत्तम रीतीने केलेले आहे. या संदर्भात प्रा. सुधाकर देशपांडे यांचे ' मालाकार चिपळूणकर ', ' मराठी वाङमयाचा इतिहास, खंड ४ व ५', ( म. सा. प. ) ' विष्णु कृष्ण चिपळूणकर – काळ आणि कर्तृत्व ' (माडखोलकर) या ग्रंथांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या थोर विवेचकांचे टीका–विवेचन इतके सांगोपांग आणि सर्वांगसुंदर आहे की त्यात मी आणखी काही भर घालू शकेन असे मला वाटले नाही आणि मुख्य म्हणजे माझी ती महत्त्वाकांक्षाही नव्हती. आता, व्यक्तिदर्शन हेच उद्दिष्ट ठरविल्यानंतर त्या संदर्भात

जेवढा आवश्यक वाटला तेवढा त्यांच्या निबंधाचा परामर्श घेणे ओघानेच आले; तो मी अर्थात घेतला आहेच. त्याचप्रमाणे त्यांच्या बाजूच्या आणि त्यांच्याविरोधी असलेल्या टीकाकारांचाही योग्य त्या प्रमाणात आदर केलेला आहे.

कारण केवळ विष्णुशास्त्र्यांच्या विरुद्ध टीका केली एवढ्याच कारणाने एखाद्या टीकाकाराचे मत अग्राह्य असते किंवा त्यांचा अभ्यास आणि त्याचे परिश्रम कमी असतात असे होत नाही. जरूर आहे ती स्तुती आणि निंदा, अनुकूल आणि प्रतिकूल विधानांची, स्वतःच्या बुद्धीने ग्राह्याग्राह्यता ठरविताना विवेकबुद्धीची. याबाबतीत विष्णुशास्त्र्यांनी सांगितलेले तत्त्वच मी आचरणात आणले आहे व तसे ते कुणालाही आणावे लागेल. 'पुरा कस लाविल्याखेरीज सोन्याचा सोनेपणा धरू नये, तसेच कोणी लौकिकाने मोठा, एवढ्यावरच जाऊन त्याच्या वचनाचे जे प्रामाण्य मानावयाचे, त्यापेक्षा आपण स्वतः होईल तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणाचेही मत ग्राह्य की अग्राह्य ते ठरवावे.' एखाद्या व्यक्तीच्या स्वभावचित्राच्या अभ्यास करावयाचा म्हणजे त्याची स्वतःची कृत्ये, त्याची भाषणे, त्याच्याबद्दल त्याच्या शत्रुमित्रांचे उद्‌गार यांचा अभ्यास करण्याची नाटकात पद्धत आहे; आणि याहीपेक्षा अधिक खोल चिकित्सा करावयाची असेल तर त्याची 'स्वगते' अभ्यासावी लागतात. चरित्र जर व्यक्तिदर्शनाच्या स्वरूपाचे असेल तर हीच साधने वापरावी लागतील हे उघड आहे. विष्णुशास्त्र्यांच्या बाबतीत मी या दृष्टीने त्याच्यावरील पहिले अभ्यासिलेले पुस्तक म्हणजे त्यांच्या बंधूंनी त्यांचे लिहिलेले चरित्र होय. हे चरित्र १८९४ साली प्रसिद्ध झालेले आहे आणि त्यात भर घालण्यासाठी नवी माहिती निदान विष्णुशास्त्र्यांबद्दल तरी अद्याप माझ्या वाचनात आलेली नाही. विष्णुशास्त्र्यांची थोडी पत्रे—या चरित्रात आणि 'विश्रब्ध शारदा' खंड १—यात आलेली पाहिली आहेत. पण या साधनांच्या पलीकडे जाऊन त्या काळच्या विष्णुशास्त्र्यांच्या संबंधित व्यक्तींची चरित्रे पाहिली तर पुष्कळच नवी आणि उद्‌बोधक माहिती मिळते व त्या काळाचे चित्र डोळ्यापुढे उभे राहते. या संदर्भात त्र्यं. र. देवगिरीकर यांचे 'वासुकाका जोशी व त्यांचा काळ,' केळकरांचे 'टिळक चरित्र' चापेकरांची 'जीवनकथा,' टिळकांचे मृत्युलेख, सरोजिनी वैद्य यांचे 'गोपाळराव हरी,' वा. कृ. परांजपे यांचे 'काळकर्ते' परांजपे' वेणुताई पानसे यांचे 'हरि नारायण आपटे' आंबेकर यांचे 'हरिभाऊ—काळ व कर्तृत्व' य. दि. फडके यांचे 'शोध बाळगोपाळांचा' व 'व्यक्ती व विचार' भट यांचे 'राजवाडेचरित्र' या ग्रंथांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. याशिवाय विष्णुशास्त्र्यांनी निबंधमालेत जागोजाग जे विस्तृत आत्मचरित्रपर उल्लेख व निवे-

दने केली आहेत तीही विचारात घेतली पाहिजेत. या सर्व माहितीचा सम्यक् विचार केला तर त्या सर्वांच्या एकीकरणातून विष्णुशास्त्र्यांचे एक एकसंघ चित्र निर्माण करणे शक्य आहे असे दिसून येईल. तोच प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. पण हे व्यक्तिदर्शन घड-वितांना जन्मापासून मृत्यूपर्यंत कालक्रमाचीच पद्धत स्वीकारली आहे. का की, त्याच पद्धतीने बीजाचा वृक्षात कसा विकास होतो हे नैसर्गिकपणे दाखवता येते. अखेरच्या प्रकरणात विष्णुशास्त्र्यांच्या परंपरेची चिकित्सा करून, आजच्या संदर्भात विष्णुशास्त्र्यांची उपयुक्तता व मूल्य Relevance काय याचे विवेचन करून हा ग्रंथ संपविला आहे. याप्रमाणे या पुस्तकात विष्णुशास्त्र्यांच्या निबंधावरची वगैरे टीका नसली तरी त्यांचे जीवन, त्यांचे व्यक्तिमत्व व त्यांचे कर्तृत्व याच्याबद्दल शक्य तेवढी माहिती दिलेली आढळेल. या ग्रंथाचे हे स्वरूप व ही मर्यादा लक्षात घेऊन तो वाचला जावा अशी अपेक्षा आहे.

## ' आम्ही विष्णुशास्त्र्यांच्या परंपरेतील आहोत ! '

मराठी पत्रकारांची परंपरा फार उज्ज्वल आहे. ' वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील आहेत.' अशा शब्दात महाराष्ट्राचे अर्वाचीन काळातले आद्य पत्रकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी पत्रकाराच्या कर्तव्याचे वर्णन केले आहे आणि त्यांच्यानंतर आलेल्या आगरकर, टिळक, केळकर, खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर आणि आचार्य अत्रे या सर्व थोर पत्रकारांनी पत्रकाराच्या या स्वधर्माचे कसोशीने पालन केलेले आहे. मराठी पत्रकारितेचे हे एक वैशिष्ट्य दिसून येते की सरकार स्वदेशी असो की पर-देशी असो, त्यांचे सरकारशी फारसे कधी बनलेले दिसत नाही. मराठी पत्रे काही अपवाद वगळता सामान्यतः सरकारच्या विरोधीच असतात, कदाचित् दिल्लीपतीच्या दरबारात ' मेरा सिर काट कर ले जावो तो ले जावे, मैं पातशाहाजीकी हुजुरी नही चलता ।' असे खडखडीत-पणे सांगणाऱ्या शिवछत्रपतीपासून ही परंपरा चालत आलेली असेल. आजही दिल्लीश्वरांचे व मराठी पत्रांचे सूत कितपत आहे हा प्रश्नच आहे. ह्या झुंजार वृत्तीप्रमाणेच मराठी पत्र-कारांनी लालित्याची व साहित्य गुणांची जोपासना मोठ्या आस्थेने केलेली दिसून येईल. शिवरामपंतांचा ' शिवाजीची एक रात्र, ' ' दृढवाची गोष्ट खोटी असली पाहिजे,' किंवा अच्युतराव कोल्हटकरांची ' शेवटची वेल सुकली ! ' किंवा आचार्य अत्र्यांचे ' सूर्यास्त ' या संदर्भात कोणाला आठवणार नाहीत ?

' सोबत ' चे निर्माते आणि भूतपूर्व संपादक कै. ग. वा. बेहेरे यांच्या पत्रकारितेत मराठी पत्रकाराच्या ह्या झुंजार आणि रसिक वृत्तीचा आढळ नेहमी होत आलेला होता, हे जाण- त्यांना सांगणे नकोच. त्यांचा हिंदुत्ववादाचा पुरस्कार, सरकारवरची निर्भय आणि प्रखर टीका, दलित साहित्याविषयी, साहित्यसंमेलनाविषयी, ग्रंथालीसारख्या चळवळीविषयी; शासन साहित्य आणि अनुदान यांच्याविषयी प्रकट केलेले विचार पाहिले म्हणजे बेहेरे ही पत्रकारितेतील एक शक्ती होऊन गेली असेच म्हणावे लागेल. पु. भा. भावे, ग. दि. माडगूळकर, खांडेकर, अ. ज. करंदीकर, टिळक, सावरकर, रामदास यांच्यावरचे त्यांचे लेख म्हणजे गुणग्रहणाचे रमणीय नमुनेच आहेत. त्यांचे सारे पत्रकारितेचे जीवन म्हणजे एक अखंड वादळ होते-जे त्यांच्याबरोबर संपले. कारण गाडी उताराला लागली, आणि ' दिसो लागे मृत्यु ' अशी अवस्था आली तरी त्यांचा वादविवादाचा पीळ कमी झाला नव्हता.

याबाबतीत त्यांचे साम्य श्रीपाद महादेव माटे यांच्याशी होते. माटे यांचेही सारे आयुष्य वाद खेळण्यात आणि खेळवण्यात गेले. अशाच एका प्रसंगी त्यांचे एकेकाळचे विद्यार्थी वि. मा. दी. पटवर्धन यांनी त्यांना शोकनाट्यातील धीरोदात्त नायकाची उपमा देऊन पत्र लिहिले की–' हत्तीच्या गंडस्थळात मद असतो तोपर्यंत वनराज त्याच्यावर झेप घेणारच- पण ' मद जाऊनि गंडस्थळ शुष्कचि होता बहुकाले । भृंग ततीहि सोडुनि जाती ॥–ही जगाची रीतच आहे.' तेव्हा माटे यांनी त्यांना लिहिले--

' पण वि. मा. दी. तुम्ही म्हणता तसा मी हरलेलो नाही. माझे गंडस्थळही अद्याप शुष्क झालेले नाही. उतारवयात प्रकृती आणि पुरुष यात भांडण असते. हात मंदावतो, केस गळून पडतात; पण प्रतिभेचा अंकुर फोफावतो. विरोधकांनी वाद करावे आणि ते मी परतवून लावावे यातच मजा आहे. कै. गडकरी यांच्या एका काव्यपंक्तीत थोडा फरक करून मी म्हणेन–' निर्वैर चिरंजीवन ते । जगि दगडालाही मिळते.' लेखणीच्या खुमखुमीत आम्ही विष्णुशास्त्र्यांच्या परंपरेतील आहोत ! '

बेहेरे यांना कोणी विचारले असते तर त्यांचेही उत्तर हेच आले असते– ' आम्ही विष्णु- शास्त्र्यांच्या परंपरेतील आहोत ! '

विष्णुशास्त्र्यांच्या परंपरेतील या थोर पत्रकाराला विष्णुशास्त्र्यांवरचे हे पुस्तक अर्पण करण्यास मला आनंद वाटत आहे.

शा. श्री. पुराणिक
लक्ष्मीनिवास–हनुमानवाडी, चाळीसगाव ४२४१०१

## साभार ऋणनिर्देश


१) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र — अ. कृ. चिपळूणकर
२) विष्णु कृष्ण चिपळूणकर (काल आणि कर्तृत्व) — ग. त्र्यं माडखोलकर
३) मालाकार चिपळूणकर — सुधाकर शंकर देशपांडे
४) गोपाळराव हरी — सरोजिनी वैद्य
५) लोकहितवादी — ग. ह. केळकर
६) केसरीची त्रिमूर्ती — पु. ग. सहस्रबुद्धे
७) निबंधमालेचे स्वरूप व कार्य — ल. रा. पांगारकर
८) संशोधक सप्तर्षि — अरविंद ताटके
९) शोध बाळगोपाळांचा — य. दि. फडके
१०) व्यक्ती व विचार — य. दि. फडके
११) आहिताग्नि राजवाडे (आत्मवृत्त)
१२) वासुकाका जोशी व त्यांचा काळ — त्र्यं र. देवगिरीकर
१३) वैदिक संस्कृतीचा विकास — तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
१४) आत्मपुराण — महादेवशास्त्री जोशी
१५) स्वामी दयानंद — ए. के. सिंह
अनु. अनंत काणेकर – ( नॅशनल बक ट्रस्ट ऑफ इंडिया )
१३) न्या. रानडे चरित्र — न. र. फाटक
१७) रमाबाई रानडे — सरोजिनी वैद्य
१८) कै. श्री. रमाबाई रानडे — उमाकांत
१९) गतगोष्टी — न. चि. केळकर
२०) टिळक चरित्र — न. चि. केळकर
२१) लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका खंड १, २; ३, — स. वि. बापट
२२) महात्मा ज्योतिराव फुले समग्र वाङ्मय — गो. गो. अधिकारी
२३) शतपत्रे — लोकहितवादी
२४) मी युरोपात काय पाहिले ? — द. वा. पोतदार
२५) निबंधमाला
२३) निबंधमाला भाग ३ रा — कृष्णराव मांडे (१८९०)
२७) विष्णुपदी खंड १, २, ३ — श्री. ना. बनहट्टी
२८) काळकर्ते परांजपे — वा. कृ. पराजपे
२९) हरि नारायण आपटे — वेणुताई पानसे
३०) हरिभाऊ काळ व कर्तृत्व — वि. वा. आंबेकर
३१) राजवाडे चरित्र – — भा. वा. भट

३२) चरित्रचंद्र– ल. रा. पांगारकर
३३) ऐतिहासिक पोवाडे आॅक्वार्थ व शाळिग्राम
३४) जीवनकथा ना. गो. चापेकर
३५) लो. टिळकांचे केसरीतील लेख – खं. ४
३६) विचारशलाका श्री. म माटे
३७) मराठी वाङमयाचा इतिहास खंड ४ व ५ – म. सा. प. पुणे
३८) अर्वाचीन मराठी वाङमय शोध गं. दे. खानोलकर
३९) चिपळूणकर दर्शन मॉडर्न बुक डेपो– पुणे २
४०) आगरकर दर्शन मॉडर्न बुक डेपो– पुणे २
४१) आगरकर चरित्र– मा. दा. आळतेकर
४२) मोरोपंत चरित्र व काव्यविवेचन – ल. रा. पांगारकर
४३) व्यक्तिरेखा – ग. त्र्यं. माडखोलकर
४४) राजविद्या – पु. ग. सहस्रबुद्धे
४५) जोशी–पुराण – श्री. ज. जोशी
४६) काळांतील निवडक निबंध – शि. म. परांजपे
४७) विवेकानंद – हिंदुधर्म – शिकागो धर्म परिषद – निबंध १८९३
४८) यशवंतराव खरे – ह. ना. आपटे
४९) माझे रामायण – द. आ. तुळजापूरकर

वरील सर्व ग्रंथकारांचा मी आभारी आहेच पण याशिवाय म. सा. प. चे श्री. म. श्री. दीक्षित यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. विष्णुशास्त्री हे पुणेकर आणि त्यांच्याबद्दल श्री. दीक्षितांसारख्या चौकस व साक्षेपी 'पुणेकरा'शी केलेल्या चर्चेचा फार उपयोग झाला. त्यांनी अनेक दुर्मिळ ग्रंथ सुचविले, डोलकर आळीतील विष्णुशास्त्री यांच्या राहत्या घराचा 'शोध' त्यांच्यामुळेच मला लागला. दत्तो वामन पोतदार यांच्या नंतर 'पुण्याचा चालता बोलता इतिहास' म्हणून दीक्षितांचाच निर्देश करावा लागेल असे वाटते. विष्णुशास्त्री यांच्या त्या घरातले सध्याचे बिऱ्हाडकरू श्री. परांजपे व श्रीमती साठे यांनी तत्परतेने घर दाखविले व सर्व माहिती आस्थेने पुरविली. हे त्यांचे ऋण मीं येथे मोठ्या आनंदाने मुद्दाम नमूद करून ठेवीत आहे. त्याचप्रमाणें श्री. रवि बेहेरे यांनीं लागतील ते ग्रंथ विनाविलंब पुरविले, याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे. चाळीसगाव येथील कॉलेज व नगर वाचनालय यांची ग्रंथांबद्दल मदत नेहमीच होत राहिलेली आहे. त्यांचेही आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

**श. श्री. पुराणिक**

विष्णुशास्त्री इ. स. १८५०

# प्रकरण पहिले

## जन्म व बालपण

### फडणिसाचा शागीर्द झाला

' चिपळूणकर ' हे नाव उच्चारले की, विष्णुशास्त्र्यांचे स्मरण होते आणि ते योग्यच आहे. कारण, विष्णुशास्त्र्यांमुळेच चिपळूणकर हे नाव मराठी जीवनात आणि मराठी साहित्यात प्रथम प्रसिद्ध झाले. परंतु , विष्णुशास्त्र्यांपूर्वी चिपळूणकर हे केवळ अज्ञात व अप्रसिद्ध होते असे नाही. चिपळूणकर घराणे फार मोठे व फार प्रतिष्ठेचे होते. पेशवाईत व आंग्लाईत चिपळूणकर हे फार मातबर सावकार होते. त्यांची लाखो रुपयांची सावकारी होती. होळकर, जमखिंडीकर, भोरकर, सांगलीकर, अक्कलकोटकर, रामदुर्गकर वगैरे सर्व संस्थानिकांस हे चिपळूणकर कर्जाऊ रकमा देत असत. पुण्यातल्या बड्या लोकात यांची गणना होती. ह्यांचे वजन सरकार दरबारी फार होते. प्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे यांचे चिरंजीव गोपाळशास्त्री यांनी इंग्रज सरकारकडून मिळणारे बावीसशे रुपयांचे पेन्शन आणि राहता वाडा कर्जापोटी चिपळूणकरांकडे गहाण टाकले होते. त्या स्वस्ताईच्या काळात चिपळूणकरांचा घरखर्च दरमहा हजार ते दीड हजार रुपये होता. शास्त्री, पंडित व भट-भिक्षुक यांना चिपळूणकरांचा उदार आश्रय असे व बाबजी शास्त्री नावाच्या एका चतुर शास्त्र्याने नक्षत्राच्या परिभाषेत चिपळूणकरांची काव्यमय प्रशंसा केली होती, की, 'अश्विनी भवतु भूप मन्दिरे। मन्दिरे वसतु ते पुनर्वसु। कृत्तिका पति कनिष्ठ सेवया। रोहिणीतमय विस्मयो भवेत्॥ तात्पर्य काय की, अशा प्रकारे विष्णुशास्त्र्यांचा अवतार भूतलावर होण्याआधीच चिपळूणकरांचे घराणे पूर्वापार प्रसिद्ध झाले होते.

चिपळूणकर हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातले पावसचे. पावसहून विष्णुशास्त्र्यांचा सहावा किंवा सातवा पूर्वज कोकणातून सतराव्या शतकाच्या आरंभीच देशावर नाशिकजवळ त्र्यंबकेश्वरी येऊन राहिला. यानंतर विष्णुशास्त्री यांचे पणजे महादजीपंत यांनी त्र्यंबकेश्वर जवळ श्रीहर्ष म्हणून जो किल्ला आहे, याची फडणिशी पेशवाईत संपादन केली. ती वंश-परंपरा त्यांचे पुत्र त्र्यंबकपंत व कृष्णाजीपंत यांचेकडे चालू राहिली. यावेळी त्र्यंबकेश्वरी चिपळूणकर हे ' नाईक ' या नावाने प्रसिद्ध होते. ' नाईक ' हा पेशवाईत सावकारीचा हुद्दा असे. त्र्यंबकपंतानंतर त्यांचे चिरंजीव हरिपंत यांचेकडे फडणिशी आली. परंतु त्यांच्या नशिबात फडणिशीचे ऐश्वर्य भोगण्याचे नव्हते. कारण त्यांच्या वेळी काळ विपरीत आला